**राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ**

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**

**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र. ४२३४/२०२३/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्रीमती. उज्वला जयंत पाटील, रा. बी ४०२, युगंधर सुदामा, गोखलेवाडी, मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व), ता. कल्याण, जि. ठाणे-४२१२०१. | उपअभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक, महानगरपालिका, नाशिक, राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, (पोस्ट बॉक्स नं. १२), नाशिक, ता. जि. नाशिक-४२२००२. | कार्यकारी अभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक, राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, (पोस्ट बॉक्स नं. १२), नाशिक, ता. जि. नाशिक-४२२००२. |

**सुनावणी दिनांक — २२/०५/२०२५**

१. **उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| ऑनलाईन उपस्थित | उपस्थित | उपस्थित | उपस्थित | उपस्थित |

२. **द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : ०६/०७/२०२३

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती पुरविण्यात आलेली नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळावी.

३. **माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०६/०४/२०२३

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ११/०४/२०२३

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : ०१ ऑगस्ट २०२२ ते आजतागायत.

**(४ ) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्रमांक : नामपा-२०२२/प्र.क्र.०५/नवि-२५. दि. ३०/११/२०२२ रोजीच्या पत्रानुसार, केलेल्या कार्यवाही अहवालाची सत्यप्रत मिळणेबाबत. नगर विकास विभाग, मंत्रालय (मुख्य इमारत) ४ था मजला, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई -४०००३२ यांचे, विषयांकीत पत्रातील अ.क्र.०२, संदर्भ क्र. १३९९ नुसार, नमूद केलेप्रमाणे, मी दि. १९/०८/२०२२ रोजीच्या अर्जाद्वारे संबंधितांविरोधात मा. न्यायालयात दाद मागणेसाठी, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७ नुसारची परवानगी मिळणेकरीता विनंती केली होती. त्या अनुषंगाने नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडून, मा. आयुक्त, नाशिक

महानगरपालिका, नाशिक यांना दि. ३०/११/२०२२ रोजीच्या विषयांकीत पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. तरी मा. आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी, नगर विकास विभागाच्या विषयांकीत पत्रानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची सत्यप्रत मिळावी.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

**४. प्रथम अपील -**

| | | |
|---|---|---|
| (१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक | : | १०/०५/२०२३ |
| (२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : | १२/०५/२०२३ |
| (३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण | : | माहिती प्राप्त झालेली नाही. |

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १७/०१/२०२४ रोजी सुनावणी घेवून त्यामध्ये अपिलार्थी यांनी दिनांक १२/०५/२०२३ रोजीचे पत्रात नमुद केलेनुसार दिनांक १९/०८/२०२२ अन्वयेच्या मा. शासनास दिलेल्या पत्राचे अनुषंगाने तसेच उपरोक्त पत्रानुसार मा. शासनाने दिनांक ३१/११/२०२२ रोजी कळविलेनुसार, दि. १९/०८/२०२२ च्या पत्रावर नमूद केलेनुसार केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची सत्यप्रतची मागणी केलेली आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी वरीलप्रमाणे नमुद माहिती विनाशुल्क अपिलार्थी यांना देणे आवश्यक आहे. तथापि यापुर्वीच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक माहिती विहीत मुदतीत देणे अभिप्रेत होते. सबब, अपिलार्थीस आवश्यक माहिती ०८ दिवसात देण्यात यावी. तसेच सदर बाबत स. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा करावा. असे आदेशित करुन अपिल अर्ज निकाली काढले असल्याचे दिसून येते.

**५. युक्तिवाद/लेखी खुलासा —** सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, अपिलार्थी यांच्या दि. १९/०८/२०२२ रोजीच्या तक्रार अर्जाच्या व नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या दि. ३०/११/२०२२ च्या पत्र अनुषंगाने अपिलार्थी यांना दि. २६/०४/२०२३ अन्वये माहिती/उत्तर देण्यात आलेले आहे. तथापि निवडणूका असल्यामुळे माहिती अर्जास अनुसरुन माहिती देता आलेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिल अर्जावर दि. १७/०१/२०२४ रोजी सुनावणी घेवून आदेश पारीत केलेला आहे.

**६. निष्कर्ष —**

१. अपिलार्थीने केलेल्या माहिती अर्जासंदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगरनियोजन विभाग, म.न.पा. नाशिक यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

२. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नगर नियोजन विभाग नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी प्रथम अपिल अर्जावर दि. १७/०१/२०२४ रोजी सुनावणी घेऊन आदेश पारीत केल्याचे दिसून येते.

३. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. १२/०२/२०२४ च्या पत्रान्वये माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर अपिलार्थीस कळविले असल्याचे दिसून येते.

४. अपिलार्थी यांना अद्यापही माहिती अप्राप्त असल्याचे दिसून येते.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता नगर नियोजन विभाग नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०६/०४/२०२३ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही. त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगरनियोजन विभाग, नाशिक, म.न.पा. नाशिक (श्री. रविंद्र बागुल) यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) प्रस्तुत द्वितीय अपिल क्रमांक ४२३४/२०२३/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

जावक क्र. ७२९२ 15 SEP 2025